नियमित दिवाणी दावा क्र. २०५/२०२२
( CNR NO.MHNS130008692022)
रेखा .. वि... बाळु

## निशाणी क्र.३४ खालील आदेश

प्रस्तूत अर्ज हा प्रतिवादी क्र. ५ यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला "विना कैफीयतचा" आदेश रद्द व्हावा यासाठी केलेला आहे. त्यावर वादीने दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादीच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. ५ दि. १७/०९/२०२२ रोजी वकिलांमार्फत हजर झालेले आहेत. मात्र प्रतिवादी हया आजारी असल्याने तसेच अल्प शिक्षीत असल्याने योग्य तया माहितगार वकिलांशी संपर्क ठेवता आला नाही त्यामुळे प्रतिवादी क्र. ५ हिस जबाबदावा दाखल करणे शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द "विना कैफीयतचा" आदेश पारीत झाला आहे. सबब प्रतिवादी यांचा प्रस्तूतचा अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली आहे.

३. वादीचा सदर अर्जास म्हणणे देवून आक्षेप नोंदविला की, प्रस्तुत अर्ज खरा नसुन अर्जाच्या पुष्ठयर्थ कोणतेही सबळ कारण नमुद केलेले नाही. सदर दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी प्रतिवादी क्र. ५ हिच प्रयत्न आहे. अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ५ हिने कोणताही लेखी अथवा तोंडी पुरावा दिलेला नाही. तसेच प्रतिवादी क्र. ५ हिने किती विलंब आहे हे हि अर्जात नमुद केलेले नाही. सबब, प्रतिवादी क्र. ५ चा अर्ज ५०००/– कॉस्टवर मंजुर करण्यात यावा. अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

४. दोन्ही बाजूंचे म्हणणे पाहिले. दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकारांचे म्हणणे दाखल होणे व त्यांची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश:

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ५ यांचे विरुध्द झालेला “विनाकैफीयत” आदेश त्यांनी वादीला रु.२००/– (दोनशे रुपये फक्त) खर्च या अगर पुढील तारखेस देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

KOLEKAR PRASAD DIPAK

Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2024.07.24 10:49:56 +0530

(पी.डी. कोळेकर)

दिनांकः– २३ /०७/२०२४ दिवाणी न्यायाधिश क. स्तर.,

पिंपळगांव बसवंत